बिसेन डेन्टल केअर
डॉ.दिप(पंकज) बिसेन डॉ.खुशबू बिसेन(पटले)
दंत व मुख रोगविशेषज्ञ
बी.डी.एस.(नागपूर)
ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया
सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०



साप्ताहिक http://berartimes.com

# बेरार टाईम्स

मुख्य संपादक :- खेमेंद्र कटरे, सहसंपादक :- सुरेश भदाडे






गोंदिया शहरात बेरार टाईम्सचा अंक चौरसिया पान सेंटर जयस्तंभ चौक गोंदिया येथे उपलब्ध



आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -१५ गोंदिया | अंक १५ | बुधवार, दि.१८ ते २४ मार्च २०२६ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/104/2025-2027


## व्याघ्रप्रकल्पाकडे बपरक्षेत्र आल्याने १८५ गावांच्या विकासाची नवी दारे उघडणार






**गोंदिया**–नवेगाव–नागझिरा व्याघ्र राखीव क्षेत्राच्या (एएनटीआर) प्रशासकीय इतिहासात २४ डिसेंबर २०२५ रोजी एक सुवर्णपान जोडले गेले आहे. गेल्या अनेक वर्षांपासून प्रतीक्षेत असलेला मएकसंघ नियंत्रणफ (युनिफाईड कंट्रोल) आराखडा महाराष्ट्र शासनाने मंजूर केला आहे. या ऐतिहासिक निर्णयामुळे आता व्याघ्र प्रकल्पाचे कोअर (गाभा) आणि बफर क्षेत्र अशा दोन्ही भागांवर क्षेत्र संचालकांचे थेट प्रशासकीय नियंत्रण असणार आहे. प्रादेशिक वनविभाग आणि वनविकास महामंडळाचे बफर क्षेत्रावरील अधिकार आता पूर्णपणे व्याघ्र प्रकल्प प्रशासनाकडे वर्ग झाले असून येत्या १ एप्रिलपासून बपर क्षेत्रातील १८५ गावात विकासाची नवी दारे खुलणार असल्याची माहिती नवेगाव नागझिरा व्याघ्रप्रकल्पाच्या क्षेत्र संचालक पियुषा जगताप यांनी (दि.१७)पत्रकारांच्या अभ्यास दौऱ्यादरम्यान माहिती दिली.सोबतच गोंदिया जिल्ह्यात नवी ४ पर्यटनाची दारे बपर क्षेत्रात उघडली जाणार असल्याचेही त्यांनी सांगितले.व्याघ्रप्रकल्पाचा ७० टक्के भाग हा गोंदिया जिल्ह्यात असल्याने या प्रकल्पाच्या विकासात्मक वाटचालीत गोंदिया जिल्ह्याची महत्वाची भुमिका टिकवून ठेवण्याकरीता पत्रकार आणि वन्यजिव विभागात सवांद कायम असावा या उद्देशाने आज मंगळवार (दि.१७)ला नागझिरा व्याघ्रप्रकल्पाचा अभ्यास दौरा आयोजित करण्यात आला होता. त्या निमित्त आयोजित कार्यशाळेत त्या बोलत होत्या.

यावेळी उपसंचालक प्रितमसिंह कोडापे,एसीफ देवकर, बिपीन लांडगे,जिल्हा माहिती अधिकारी अंजु काबंळे,वनपरिक्षेत्राधिकारी आयषा लांबट, वनपरिक्षेत्राधिकारी रिजवी,श्री.मडावी, श्रीमती रामटेके आदी वनअधिकारी उपस्थित होते.

**काय आहे 'एकसंघ नियंत्रण'?४ नवे द्वार खुले होणार**

नवेगाव–नागझिरा व्याघ्र राखीव क्षेत्राच्या (एएनटीआर) व्याघ्रप्रकल्पाचा ७० टक्के भाग हा गोंदिया जिल्ह्यात तर ३० टक्के भाग भंडारा जिल्ह्यातील येतो.राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणाच्या निकषांनुसार, व्याघ्र प्रकल्पाच्या प्रभावी व्यवस्थापनासाठी संपूर्ण क्षेत्रावर एकाच विभागाचे नियंत्रण असणे गरजेचे असते. आतापर्यंत ६५३.६७४ चौ.कि.मी.चे कोअर क्षेत्र वन्यजीव विभागाकडे होते, तर ६४८.२१ चौ.कि.मी.चे बफर क्षेत्र प्रादेशिक विभाग व एफडीसीएमकडे विभागलेले होते. नव्या निर्णयामुळे आता संपूर्ण १३०१.८८३ चौ.कि.मी. क्षेत्राचे व्यवस्थापन थेट व्याघ्र प्रकल्पाच्या माध्यमातून होईल.यासोबतच बपर क्षेत्र वन्यजीव विभागाच्या ताब्यात आल्याने गोंदिया जिल्ह्यात ४ नवे प्रवेशद्वार सुरु होण्याचा मार्ग मोकळा झालेला आहे.यामध्ये आधी सुरु असलेला पण २९ वर्षापासून बंद असलेल्या मुरदोली प्रवेशद्वाराचाही समावेश आहे.याशिवाय सडक अर्जुनी तालुक्यातील जांभडी/दोडके,गोंदिया तालुक्यातील पागंडी व अर्जुनी मोरगाव तालुक्यातील माधवझरी(चुटीया)येथे नवीन प्रवेशद्वार सुरु करण्यात येणार आहे.

**प्रशासकीय पुनर्गठन : नवी विभाग व मुख्यालये प्रभावी**

देखरेखीसाठी व्याघ्र प्रकल्पाचे दोन मुख्य विभागात विभाजन करण्यात आले आहे. नागझिरा विभाग (मुख्यालयः गोंदिया) प्रमुखः उपसंचालक, नवेगाव–नागझिरा व्याघ्र राखीव क्षेत्र, गोंदिया. त्याची व्याप्ती नागझिरा, नवीन नागझिरा, कोका, गडेगाव, पिटेझरी आणि सडक अर्जुनी यांसह ०८ वनपरिक्षेत्र असेल. **सहायक वनसंरक्षक पदे**: तिरोडा, गोंदिया आणि साकोली येथे एसीएफ कार्यालये असतील.

**नवेगाव बांध विभाग** (मुख्यालयः साकोली) प्रमुखः विभागीय वन अधिकारी (नवेगाव), साकोली. त्याची व्याप्ती नवेगाव पार्क, डोंगरगाव, झाशीनगर आणि बोंडे ही ०४ **वनपरिक्षेत्र. सहायक वनसंरक्षक पद**: साकोली येथे मुख्यालय असेल.


शिकार व तस्करीवर रोखः संपूर्ण १३०१ चौ.कि.मी. क्षेत्रावर आता मविशेष व्याघ्र संरक्षण दलाच्याफ ३ तुकड्या अधिक सक्षमपणे गस्त घालतील. मानव–वन्यजीव संघर्ष निवारणः बफर क्षेत्रातील गावांशी समन्वय साधणे आणि वन्यप्राण्यांच्या हल्ल्यातील नुकसान भरपाईची प्रक्रिया आता अधिक जलद होईल.

**बपर क्षेत्र वाढल्याने रोजगार निर्मितीत होणार वाढ**

ताडोबा, पेंच व्याघ्र प्रकल्पाच्या बफर क्षेत्रात पर्यटन व इतर संबंधित प्रकल्पातून स्थानिकांना मोठ्या प्रमाणावर रोजगार उपलब्ध झालेला आहे. त्याचप्रमाणे आता नवेगाव नागझिरा व्याघ्रप्रकल्पात १२०० चौकिमी क्षेत्र बपरचा व्याघ्र प्रकल्पाकडे १ एप्रिलपासून येत असल्याने १८५ गावातील लोकांना रोजगाराच्या नव्या संधी पर्यटनाच्या माध्यमातून उपलब्ध होणार आहे. नवीन पर्यटन प्रकल्प, सफारी गेट सुरू झाल्यानंतर स्थानिकांना त्याचा फायदा होणार आहे. काही घटक स्थानिकांना कुपकटाई, तेंदूपाने, मोहफुले यातील रोजगार बंद होण्याबाबत गैरसमज पसरवत आहेत. मात्र व्यवस्थापन सुधारणेमुळे यावर कोणतीही बंदी येणार नाही.तसेच बपर क्षेत्रामध्ये आधी जी कामे शेतीसह इतर केली जात होती,ती नियमितप्रमाणेच सुरु राहणार आहे.

**पियुषा जगताप क्षेत्र संचालक नवेगाव नागझिरा व्याघ्र प्रकल्प**

## अखेर सत्याचा विजय:खासदार डॉ.प्रशांत पडोळे यांचे निलंबन मागे


No. LAFEAS-TO-B048/1/2026-TO(B) Dated the 17th March, 2026

From
Ajay Kumar Sood
Director


To
Dr. Prashant Yadavrao Padole, MP

Subject: Termination of suspension from the Service of the House under Rule 374.

Sir,

I am directed to refer to this Secretariat letter of even number dated 3rd February, 2026 on the subject mentioned above and to state that your suspension from the service of the House which was effected on 03.02.2026 has been terminated with immediate effect i.e., 17th March, 2026.

Yours faithfully,
17/03/2026
DIRECTOR
Tel. No. 23082333
Email: tableb-lss@sansad.nic.in



**नवी दिल्ली,**– लोकसभा अधिवेशनादरम्यान निलंबित करण्यात आलेले भंडारा गोंदिया लोकसभा क्षेत्राचे खा.डॉ.प्रशांत यादवरावजी पडोळे यांचे निलंबन अखेर मागे घेण्यात आले असून, नियम ३७४ अंतर्गत करण्यात आलेली कारवाई तत्काळ प्रभावाने रद्द करण्यात आली आहे. लोकसभा सचिवालयाकडून जारी करण्यात आलेल्या अधिकृत पत्राद्वारे हा निर्णय जाहीर करण्यात आला. यापूर्वी दि. ३ फेब्रुवारी २०२६ रोजी त्यांना सभागृहाच्या सेवेतून निलंबित करण्यात आले होते.

सदर आदेश अजय कुमार सूद, संचालक, लोकसभा सचिवालय यांच्या स्वाक्षरीने जारी झाला असून, दि. १७ मार्च २०२६ पासून डॉ.पडोळे यांचे निलंबन रद्द करण्यात आले आहे.

निलंबनाच्या काळात डॉ. पडोळे यांनी शांत बसण्याऐवजी आक्रमक भूमिका घेत लोकसभेच्या पायऱ्यांवर दररोज बसून आंदोलन केले. विविध जनहिताच्या मुद्द्यांवर त्यांनी सातत्याने आवाज उठवत सरकारला धारेवर धरले. विशेष म्हणजे, सभागृहाबाहेरूनही त्यांनी आपली लढाई सुरू ठेवत शेतकरी, बेरोजगारी, ओबीसी जनगणना, तसेच स्थानिक प्रश्न यांसारखे मुद्दे राष्ट्रीय पातळीवर मांडले.

दररोज चालणाऱ्या या आंदोलनामुळे राजकीय वातावरण तापले होते. माध्यमांमध्येही या आंदोलनाची मोठ्या प्रमाणावर दखल घेतली जात होती. त्यामुळे केंद्र सरकारवर सातत्याने दबाव निर्माण होत असल्याची चर्चा राजकीय वतुर्ळात रंगली होती. काही राजकीय विश्लेषकांच्या मते, या सततच्या आंदोलनामुळे सरकारची प्रतिमा प्रभावित होत होती आणि त्यामुळेच सरकारला अखेर एक पाऊल मागे घेत निलंबन मागे घ्यावे लागले.

ङ्गसरकारला जनतेसमोर उत्तर द्यावे लागत होते. आंदोलनामुळे दररोज सरकारची अडचण वाढत होती, आणि याच पार्श्वभूमीवर हा निर्णय घेण्यात आला,ङ्ग अशी चर्चा सध्या राजकीय वतुर्ळात सुरू आहे.

डॉ. पडोळे यांच्या या सातत्यपूर्ण लढ्यामुळे त्यांच्या समर्थकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, ङ्गअखेर सत्याचा विजय झालाङ्ग अशा भावना व्यक्त केल्या जात आहेत. अनेकांनी याला लोकशाहीच्या विजयाची नोंद म्हणून पाहिले आहे.

निलंबन मागे घेतल्यानंतर डॉ. पडोळे आता पुन्हा लोकसभेच्या कामकाजात सक्रिय होणार असून, प्रलंबित प्रश्न अधिक ठामपणे मांडण्याचा त्यांचा निर्धार आहे. आगामी अधिवेशनात ते अधिक आक्रमक भूमिकेत दिसतील, अशी शक्यता व्यक्त केली जात आहे.

या संपूर्ण प्रकरणामुळे संसदीय परंपरा, विरोधी पक्षाची भूमिका आणि आंदोलनाची ताकद याबाबत नव्याने चर्चा सुरू झाली असून, डॉ. पडोळे यांचे आंदोलन हे आगामी काळात एक महत्त्वाचा राजकीय संदर्भ म्हणून पाहिले जात आहे.

भंडारा गोंदिया मतदार संघातील हा जनतेचा विश्वास आहे माझ्यावर त्यामुळे मी लढू शकलो. पुन्हा नव्याने उठून आक्रमक भूमिका आपल्याला न्याय देण्यासाठी घेईन असेही त्यांनी बोलतांना सांगितले.

## गोंदिया जि.प.चा २२ कोटी ३३ लाखाचा संभाव्य अंदाजपत्रक सादर

**गोंदिया :** जिल्हा परिषदेचा सन २०२५–२०२६ चा सुधारीत ४८ कोटी ७३ लाख ७६ हजार ०८९ रुपये व २०२६–२७ चा २२ कोटी ३३ लाख ५५ हजार ७३१ रुपयांच्या संभाव्य खर्चाचा अर्थसंकल्प जि.प.अर्थ सभापती डॉ.लक्ष्मण भगत यांनी (दि.०९) सभागृहात सादर केला.

अर्थसंकल्पात महिला बालकल्याण, समाजकल्याण, पाणी पुरवठा आणि कृषी विषयक योजनांवर तरतूद करण्यात आली आहे. जिल्हा परिषदेची अर्थसंकल्पीय सर्वसाधारण सभा सोमवारी दुपारी १ वाजता जि.प.च्या स्व.वसंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करण्यात आली होती. जि.प.अध्यक्ष लायकराम भेंडारकर यांच्या अध्यक्षतेखाली सभेला सुरू सुरवात झाली. जि.प. बांधकाम तथा अर्थ सभापती डॉ.लक्ष्मण भगत व मुख्य लेखा वित्त अधिकारी जनार्दन खोटरे यांनी दुपारी १ वाजता अर्थसंकल्प सादर केला. यावेळी जिल्हा परिषद उपाध्यक्ष सुरेश हर्षे, कृषी व पशुसंवर्धन सभापती दिपा चंद्रिकापुरे, महिला बालकल्याण सभापती पौर्णिमा ढेंगे, समाजकल्याण सभापती रजनी कुंभरे, मुख्य कार्यकारी अधिकारी एम.मुरुगनथन,अति.मुख्य कार्यकारी अधिकारी तानाजी लोखंडे,उपमुख्य कार्यकारी अधिकारी फनेंद्र कुतीरकर यांच्यासह विभागप्रमुख उपस्थित होते.

या अर्थसंकल्पात समाज कल्याण, ग्रामीण पाणी पुरवठा,शेतीसाहित्य, महिला व बाल कल्याण व दिव्यांग कल्याणासाठी भरीव निधीची तरतूद करण्यात आली.जिल्हा परिषद सदस्यांना दिल्या जाणारा निधी १२.लाख रुपये करण्यात आले.

जिल्हा परिषदेचे २५–२६ या आर्थिक वर्षातील सुरुवातीची शिल्लक धरून व प्राप्त उत्पन्नाचे आधारे सुधारित उत्पन्न २०२५–२६ च्या अर्थसंकल्पात ४८ कोटी ७३ लाख ७६ हजार ०८९ रुपये एवढे करण्यात आले. तर संभाव्य २०२६–२७ संभाव्य उत्पन्न २२ कोटी ३३ लाख ५५ हजार ७३१ रुपये निर्धारित करण्यात आले आहे.

समाजकल्याण विभाग,मागासवर्गीयांच्या कल्याणसाठी योजनेकरीता जिल्हा परिषदेच्या उत्पन्नातून २० टक्के .१ कोटी ९ लाख १०.हजार १०० रुपयाची तरतूद करण्यात आली आहे.

दिव्यांग कल्याणासाठी ५ टक्के निधी अंतर्गत..१७ लाख ५०.हजार रुपयाची तरतूद करण्यात आली आहे.ग्रामीण पाणी पुरवठा विभागाकरीता २० टक्के निधीतून ९० लाख, महिला बालकल्याण विभागाकरीता १० टक्के निधीतून १ कोटी १७ लाख ६० हजार तर शिक्षण विभागाकरीता ५ टक्के निधी अंतर्गत.३ कोटी १४ लाख ८० हजार १० रुपयाचा निधीची तरतूद केली आहे. त्याचप्रमाणे या अर्थसंकल्पात २०२६–२७ च्या एकुण अंदाजित उत्पन्न व सुरवातीच्या शिल्लक धरून २२ कोटी ३३ लाख ५५ हजार ७३१ रुपये एवढा निधी आहे.त्याप्रमाणे सण २०२६–२७ या अर्थसंकल्पात बांधकाम विभागाकरीता ३ कोटी ७७ लाख ४० हजार ०५० रुपये , शिक्षण विभागाकरीता ३ कोटी १४ लाख ८० हजार ०१० रुपये, आरोग्य विभागाकरीता ७६ लाख ८० हजार, ग्रामीण पाणी पुरवठा विभागाकरीता ९० लाख, समाजकल्याण विभागाकरीता .१ कोटी ९ लाख १० हजार १०० रुपये, दिव्यांग कल्याणासाठी १७ लाख ५० हजार, महिला बालकल्याण विभागाकरीता १ कोटी १७ लाख ६० हजार , कृषि विभागाकरीता ८२ लाख.११ हजार १०० रुपये, पशुसंवर्धन विभागाकरीता ६५ लाख १० हजार, सामान्य प्रशासन विभागाकरीता २ कोटी ९६ लाख ५० हजार ०९० रुपये , वित्त विभागाकरीता ६३ लाख ८० हजार ०२० रुपये, पंचायत विभागाकरीता ४ कोटी १८ लाख ६० हजार ०१० रुपये , लघु पाटबंधारे विभागाकरीता १ कोटी ४२ लाख रुपयाचा निधीची तरतूद या अर्थसंकल्पात करण्यात आल्याची माहिती सभापती डॉ.लक्ष्मण भगत व मुख्य लेखा वित्त अधिकारी जनार्दन खोटरे यांनी सभागृहाला दिली.

## गाव तेथे राष्ट्रवादी काँग्रेस किसान सेल संघटन निर्माण करण्याचा संकल्प - ॲड. वसंत मनकर

**गोंदिया**– जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस किसान सेल आघाडीची बैठक राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी भवन, रेलटोली कार्यालय येथे किसान सभेचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष ॲड. वसंत मनकरजी यांच्या अध्यक्षतेत संपन्न झाली.

खासदार प्रफुल पटेल यांच्या मार्गदर्शनात शेतकऱ्यांच्या प्रश्नांना संघटित पद्धतीने न्याय मिळवून देण्यासाठी ङ्गगाव तेथे राष्ट्रवादी काँग्रेस किसान सेलङ्ग हा संकल्प करायचा आहे. उपक्रमांतर्गत प्रत्येक गावात राष्ट्रवादी काँग्रेस किसान सेलची संघटना उभारून शेतकऱ्यांना त्यांच्या हक्कांसाठी मजबूत व्यासपीठ उपलब्ध करून जिल्ह्यातील समस्या माजी आमदार राजेंद्र जैन यांच्या सहकार्याने सोडवायच्या आहेत. शेतकऱ्यांच्या शेतीसंबंधित समस्या, सिंचन, वीज, तसेच शासकीय योजनांचा लाभ प्रत्येक शेतकऱ्यापर्यंत पोहोचविण्याचे काम किसान सेलच्या माध्यमातून केले जाणार आहे असे प्रतिपादन ॲड. वसंत मनकर यांनी केले.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष नेहमीच शेतकरी व सर्वसामान्यांच्या प्रश्नांसाठी लढणारा पक्ष राहिला आहे. त्यामुळे किसान सेलच्या माध्यमातून गावपातळीवर संघटन मजबूत करून




शेतकऱ्यांच्या अडचणी शासनापर्यंत पोहोचविण्यासाठी जिल्ह्यातील सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते आणि शेतकरी बांधवांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन ङ्गगाव तेथे राष्ट्रवादी काँग्रेस किसान सेलङ्ग हा संकल्प यशस्वी करावा, असे आवाहन त्यांनी केले. यावेळी गोंदिया जिल्हा किसान आघाडीची जिल्हा कार्यकारिणी व सर्व तालुक्यांचे तालुकाध्यक्ष यांचे नियुक्तीपत्र यावेळी देऊन पक्ष वाढीसाठी सर्वांना शुभेच्छा व अभिनंदन करण्यात आले.

यावेळी सर्वश्री विदर्भ समन्वयक जगदीश जुनघरी, जिल्हाध्यक्ष प्रेमकुमार रहांगडाले, डॉ गणेश डोंगरे, बबनराव तीकांडे, प्रभाकर दोनोडे, राजलक्ष्मी तुरकर, डॉ योगेंद्र भगत, कुंदन कटारे, बाळकृष्ण पटले, पूजा अखिलेश सेठ, केतन तुरकर, गोपाल चावके, कमलबापू बहेकार, रवी पटले, विजय रहांगडाले, महेंद्र चौधरी, सेविकेम डोये, रामभाऊ हरिणखेडे, धनलाल जैतवार, धनराज तावाडे, चुन्नीलाल शहारे, सत्यवान देशमुख, धर्मराज पटले, धरमलाल रहांगडाले, भरत नागपुरे, जगदीश मराठे, नितीन टेम्भरे, दिलीप डोंगरे, राधेलाल बिसेन, महेश पटले, मोरेश्वर ठाकरे, सुनील पटले, शैलेश वासनिक, अलकेश मिश्रा, किशोर पारधी, मनोहर राऊत, संजय किंदरले, वामन गेडाम, राजेश कावळे, सुभाष कापगते, मुनेश्वर कापगते, बाबुराव ब्राह्मणकर, राजेश तुरकर, चौकलाल येडे, राजेश वाघाडे, सलमान शेख सहित मोठ्या संख्येने किसान सेलचे पक्ष पदाधिकारी व कार्यकर्ता उपस्थित होते.

## महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे शुक्रवारी जिल्ह्याचे दौऱ्यावर

**गोंदिया** : राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे हे शुक्रवारी २० मार्च २०२६ रोजी जिल्ह्याचे दौऱ्यावर येत असून त्यांचा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे आहे. सकाळी १०.३० वाजता हेलिकॉप्टरने नागपूर विमानतळ येथून गोंदिया येथील कुडवा हेलिपॅडकडे प्रस्थान. सकाळी ११.२० वाजता मनोहर पटेल इन्स्टिट्युट ऑफ इंजिनियरींग ॲन्ड टेक्नॉलॉजी (एमआयटी), कुडवा हेलिपॅड येथे आगमन व मोटारीने कार्यक्रम स्थळाकडे प्रस्थान. सकाळी ११.३० वाजता टी.बी. टोली ग्राऊंड, कुडवा येथे छत्रपती शिवाजी महाराज अभियानांतर्गत तालुकास्तरीय समाधान शिबीर कार्यक्रमास उपस्थिती. दुपारी १.२० वाजता मोटारीने कुडवा येथील हेलिपॅडकडे प्रस्थान. दुपारी १.३० वाजता कुडवा हेलिपॅड येथे आगमन व हेलिकॉप्टरने नागपूर विमानतळाकडे प्रस्थान करतील.

## विदर्भ साहित्य संघाच्या निवडणुकीत गिरीश गांधीचे पॅनल विजयी



**नागपूर**– विदर्भ साहित्य संघाच्या निवडणुका पार पडल्या असून अध्यक्ष व संचालक पदाच्या मतमोजणीचे निकाल जाहीर झाले आहे. त्यानुसार विदर्भ साहित्य संघाचे नवनिर्वाचित अध्यक्ष म्हणून गिरीश गांधी निर्वाचित झाल्याचे स्पष्ट झाले आहे. डॉ. गिरीश गांधी यांना एकूण २२६१ मते पडली.२२ कार्यकारीणी सदस्यामध्ये २१ सदस्यासंह गिरीश गांधी यांच्या पॅनलने विजय मिळिवला आहे.या निवडणुकीतील उर्वरित पॅनलपैकी प्रदिप दाते यांच्या पॅनलचे एकमेव कार्यकारीणी सदस्य श्रीपाद अपराजीत हे २४८० मते घेऊन विजयी झाले.गोंदिया जिल्ह्यातील साहित्यिक एड.लखनसिंह कटरे हे सुध्दा गांधी यांच्या पॅनलमधून २३८४ मते घेऊन विजयी झाले.

मतमोजणीला सकाळी साडेनऊ वाजता प्रारंभ झाला. अध्यक्षपदासाठी उभे असलेले पाच उमेदवाराना मिळालेली मते खालील प्रमाणे. गिरीश गांधी यांना एकूण २६६१ तर प्रदीप दाते यांना ११८७ तसेच डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी यांना ७०१ तर डॉ. रवींद्र शोभने यांना २०५ आणि रंजन दारव्हेकर यांना ११४ मते पडली. एकूण ६३ मतं अवैध ठरली आहेत. या निवडणुकीसाठी ४९३५ मतदारांनी आपला हक्क बजावला होता. गिरीश गांधी हे एकूण १४७४ मतांची आघाडी घेऊन विजयी झाले आहेत.सदस्यामध्ये २७५८ फडनवीस शुभदा अनिल,२६७९ मनोहर विष्णु दिगंबर,२५४९ कुळकर्णी बळवंत जनार्दन,२५१२ घोंगे पराग श्रीधर,२४९९ गंपावार अजेय प्रभाकर,२४९५ सबाने अरुणा,२४८० अपराजित श्रीपाद विनायक,२४६२ रोकडे डॉ. शोभा इंद्रभान, २४२९ बारस्कर संदीप,२३८४ कटरे लखनसिंह मोहनलाल,२३७७ मोहरीर स्वाती, २३७० तिडके आसावरी दुद्धराम जी,२३५३ कुळकर्णी डॉ. जयश्री विश्राम आदी विजयी झाले.

## जुन्या वैमनस्यातून युवकाची निर्घृण हत्या

**गोरेगाव** -तहसील अंतर्गत पालेवाडा हेटी येथे सोमवारी (१६ मार्च) रात्री ८ वाजताच्या सुमारास जुन्या वैरातून एका युवकाची तलवारीने निर्घृण हत्या करण्यात आल्याची धक्कादायक घटना घडली. या घटनेमुळे परिसरात भीती व तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे. मृत युवकाचे नाव देवेंद्र चुन्नीलाल ताराम (२४) असे असून, तो काही दिवसांपूर्वीच जामिनावर कारागृहातून सुटून गावात परतला होता.

प्राप्त माहितीनुसार, आरोपी सुनील आसाराम कांबळे (२५) याने जुन्या वैरातून हा खून केल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. काही महिन्यांपूर्वी आरोपीच्या वडिलांच्या हत्येप्रकरणी देवेंद्र ताराम याच्याविरोधात गोरेगाव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला होता. त्या प्रकरणात त्याला अटक करून भंडारा कारागृहात पाठविण्यात आले होते. आठवडाभरापूर्वी तो जामिनावर सुटून गावात परतला होता.

## वाघ,बिबट्यांपासून सतर्कतेचा इशारा देणारी"एआय'यंत्रणा पेंच परिसरात कार्यान्वित

### १५ एप्रिलपर्यंत ४० ठिकाणांचे अलर्ट्स मिळणार

**नागपूर** : वनक्षेत्राजवळील गावांमध्ये वाघ किंवा बिबट्यांचा वावर आढळून आल्यास ग्रामस्थ आणि वन विभागाला सतर्कतेचा इशारा देणारी एआय आधारित यंत्रणा नागपूर ग्रामीण भागात तीन ठिकाणी कार्यान्वित झाली असून संबंधित परिसरात वाघ किंवा बिबट्यांचा वावर असल्याचे इशारे देखील मिळू लागले आहेत.

या यंत्रणेकडून मिळालेल्या इशाऱ्यानुसार गुरुवारी रात्रीच्या सुमारास देवलापारजवळील पिपरिया येथे दुसऱ्यांदा वाघाचा वावर असल्याचा इशारा गावकऱ्यांना आणि वन विभागाला मिळाला. विशेष म्हणजे येत्या १५ एप्रिलपर्यंत वनविभागाचे वन्यजीव क्षेत्र तसेच प्रादेशिक क्षेत्र मिळून संवेदनशील स्वरुपाच्या ४० गावांमध्ये ही यंत्रणा स्थापित करण्यात येत आहे.

नागपूर ग्रामीण भागात मागील अडीच ते तीन वर्षांच्या कालावधीत वाघ किंवा बिबट्याच्या हल्ल्यात गावकऱ्यांचा मृत्यू होण्याच्या १५ घटना घडल्या आहेत. यापैकी अनेक घटनांमध्ये गावकरयांमध्ये रोष निर्माण होऊन कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला होता. त्यावर उपाय म्हणून वन विभाग आणि नागपूर ग्रामीण पोलिसांनी "एआय' आधारित (कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित) उपाययोजना सुरु केल्या आहेत.

राज्य शासनाच्या विविध विभागांमध्ये एआय तंत्रज्ञानाचा वापर वाढविण्यात योगदान देणाऱ्या मार्व्हल या संस्थेच्या वतीने "एआय' आधारित यंत्रणा उभारण्यात येत आहे. नागपूर ग्रामीणचे पोलिस अधीक्षक हर्ष पोद्दार हे मार्व्हल संस्थेचे सीईओ देखील आहेत. पोलिस अधीक्षक पोद्दार यांनी सांगितले की, मागील दोन ते तीन वर्षात घडलेल्या घटनांमध्ये कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्याचे पहायला मिळाले. त्यावर उपाय म्हणून आम्ही "एआय' तंत्रज्ञानाचा वापर सुरु केला आहे. गावाच्या परिसरात वाघ, बिबटे, अस्वल यासारख्या आक्रमक प्राण्यांचा परिसरात वावर असल्यास सतर्कतेचा इशारा देणाऱ्या "एआय' तंत्रज्ञानावर मार्व्हलने काम केले. त्याअंतर्गत विशिष्ट ठिकाणांवर उच्च क्षमतेचे अत्याधुनिक कॅमेरे बसविण्यात आले आहेत. हे तंत्रज्ञान "बायो ॲक्यूस्टिक्स' (ध्वनी आधारित) आणि "बायो व्हिज्युअल' (प्रत्यक्ष दृष्य आधारित) अशा दोन प्रकारे काम करते. वाघ किंवा बिबटे परिसरात आल्यास चितळ, सांबर, माकड यासारखे तृणभक्षी प्राणी आणि मोर विशिष्ट प्रकारचे आवाज काढून संपूर्ण परिसराला सतर्क करतात. ते विशिष्ट आवाज टिपून हे"एआय' तंत्रज्ञान डेटाचे विश्लेषण करुन त्यासंबंधीचे सतर्कतेचे इशारे संबंधितांना पाठविण्याचे कार्य करते.

सतर्कतेचे इशारे वन विभागाचे अधिकारी व गावकऱ्यांना त्यांच्या मोबाईल फोनवर मिळू शकतात. याशिवाय "बायो व्हिज्युअल' प्रकारच्या तंत्राच्या माध्यमातून कॅमेरात प्रत्यक्ष प्राण्याचे फोटो "कॅप्चर' झाल्यास हे तंत्रज्ञान सतर्कतेचे इशारे पाठवते.

पोलीस अधीक्षक पोद्दार यांनी सांगितले की, वन विभागाच्या मदतीने आम्ही वन्यप्राण्याच्या हल्ल्यांच्या दृष्टीने संवेदनशील अशा ४० ठिकाणांची निवड केली असून तेथे प्राधान्याने कॅमेरे लावण्यात आले आहेत. याच आठवड्यात तब्बल तीन ठिकाणी ही



यंत्रणा प्रत्यक्षात कार्यान्वितही झाली असून मागील चार दिवसांत दोनदा वाघ आणि बिबट्यांचा वावर असल्याचा सतर्कतेचा इशारा वन विभाग आणि ग्रामस्थांना देण्यात आला आहे. वन विभागाच्या पेंच व्याघ्र प्रकल्पाचा समावेश असलेल्या वन्यजीव क्षेत्रासह प्रादेशिक विभागातही खापा व पारशिवनी परिसरात ही यंत्रणा कार्यान्वित होत आहे.

नवेगाव–नागझिरा व्याघ्र प्रकल्प आणि चंद्रपूर जिल्ह्यातील ताडोबा–अंधारी व्याघ्र प्रकल्पातही ही यंत्रणा उभारण्याचा प्रस्ताव असून यासंदर्भात वन विभागाचा मार्व्हल संस्थेशी सामजस्य करार झाला असल्याचे नागपूर ग्रामीणचे पोलिस अधीक्षक हर्ष पोद्दार यांनी सांगितले.

## संपादकीय

# उपराजधानीत नवे विधान भवन

नागपूर येथे नवे विधान भवन उभारण्याच्या कामाला आता गती मिळणार असल्याचे संकेत मिळत आहेत. दरवर्षी होणाऱ्या विधिमंडळाच्या अधिवेशनासाठी सध्याचे विधान भवन अपुरे पडत असल्याची समस्या अनेक वर्षांपासून जाणवत आहे. त्यामुळे आधुनिक सुविधांनी सज्ज असे नवे विधान भवन उभे राहिल्यास विधिमंडळाच्या कामकाजाला गती मिळणार आहे.

महाराष्ट्राची उपराजधानी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या नागपूर शहरात नवे विधान भवन बांधण्याचे काम २०२८ पर्यंत पूर्ण करावे, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंत्रिमंडळाच्या पायाभूत सुविधा समितीच्या बैठकीत दिले आहेत.

ज्यावेळी महाराष्ट्राचे गठन झाले, त्यावेळी त्या आधीच्या काळात विदर्भातील नेते आणि पश्चिम महाराष्ट्रातील नेते यांच्यात झालेल्या नागपूर कराराचा आधार घेऊन वर्षातील एक अधिवेशन नागपुरात घ्यावे असे ठरवण्यात आले होते.त्यानुसार दरवर्षी एक अधिवेशन नागपुरात होत असते. नागपूर शहर किंवा आजचा विदर्भाचा भाग हा महाराष्ट्रात किंवा त्या आधीच्या बॉम्बे स्टेटमध्ये येण्यापूर्वी जुन्या मध्य प्रांताचा भाग होता. त्यावेळी मध्य प्रांत हा सेंट्रल प्रॉव्हिन्स ॲण्ड बेरार म्हणून ओळखला जात होता. नागपूर शहर ही या सी.पी.ॲण्ड बेरारची राजधानी होती.त्यामुळे इथे दरवर्षी विधिमंडळाची तिन्ही अधिवेशन होत असत. त्यामुळे त्या काळात नागपुरात विधान भवन होतेच. नागपूर हे राजधानीचे शहर असल्यामुळे इथे उच्च न्यायालय होते,तसेच रिझर्व बँक देखील होती.इतरही बऱ्याच सुविधा होत्या. १९५२ ते १९५४ या काळात राज्य पुनर्रचना आयोगाने आजचा विदर्भ भाग सेंट्रल प्रॉव्हिन्स ॲण्ड बेरारमधून वेगळा काढून वेगळे राज्य करावे असे सुचवले होते. मात्र त्यावेळी मुंबई आणि पश्चिम महाराष्ट्रातील नेते मराठीचे एकच राज्य असावे असा आग्रह धरून होते. त्यामुळे मराठी भाग असलेला विदर्भ हा महाराष्ट्राला जोडला गेला.त्याला विदर्भीय नेत्यांचा विरोध होता.

विशेष म्हणजे त्यांना नागपूरचे राजकीय महत्त्व कमी होऊ द्यायचे नव्हते. म्हणून मग नागपूरला उपराजधानी मानावे आणि तिथे वर्षातील विधिमंडळाचे एक अधिवेशन घ्यावे असे ठरवण्यात आले होते. मग जुन्या मध्य प्रांतात जे विधान भवन होते तेच महाराष्ट्राचे विधान भवन म्हणून उपराजधानीत वापरले जाऊ लागले. मात्र जसाजसा व्याप वाढू लागला तसे हे विधान भवन अपुरे पडू लागले. इथे जुन्या विधान भवनात विधानसभेचे एकच सभागृह होते, तर पहिल्या मजल्यावर एका सभागृहात विधान परिषदेच्या बैठका होत असत. त्यावेळी जसा व्याप वाढू लागला तसे विधान भवन परिसरात नव्या नव्या सोयीचे प्रस्ताव पुढे येऊ लागले. मग बाजूलाच बराकी बांधल्या गेल्या. तिथे काही कार्यालय होऊ लागली. अर्थात वर्षातून एकदाच अधिवेशन होणार मग बांधकामावर खर्च का करायचा म्हणून चक्क शामियाने उभारून तिथे कार्यालय उभारली जाऊ लागली. आजही इथे तेच होत आहे.साधारणपणे १९८६-८७ मध्ये विधान भवनाची विस्तारित इमारत उभी केली गेली. मग तिथे विधानसभेचे सभागृह झाले तर आधी जे विधानसभेचे सभागृह होते तिथे विधान परिषदेचे सभागृह करण्यात आले. वरच्या मजल्यावरच्या सभागृहात समिती कक्ष बनवण्यात आला. तरीही जागा अपुरीच पडत होती. आजही ती जागा अपुरीच पडते आहे. नागपुरात जेव्हा विधिमंडळ अधिवेशन होते तेव्हा या इमारतीतून त्या इमारतीत जाण्यासाठी आणि नंतर बराकीमध्ये फिरताना सर्वसामान्य माणसाच्या पायाचे अक्षरशः तुकडे पडतात अशी अवस्था आहे. त्यामुळे प्रत्येकजण त्रासलेला असतो. विशेषतः पत्रकारांना बातम्या काढण्यासाठी इकडे तिकडे फिरावे लागते. त्यांचे फारच हाल होत असतात. पावसाळ्यात जर अधिवेशन असेल, तर लोकांच्या हालांना पारावर राहत नाही. २०१९ चे अधिवेशन जुलै महिन्यात झाले होते.त्यावेळी पावसातच सर्वांना फिरावे लागले होते. त्या तीन आठवड्यांच्या अधिवेशनात पाऊस सतत पडत होता आणि सर्वांचेच चांगलेच हाल झाले होते. त्यामुळेच देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री झाल्यावर त्यांनी नवीन विधान भवनाचा प्रस्ताव कार्यान्वित करण्याचे ठरवले. २०१९ मध्येच त्याच्या हालचालींना सुरुवात झाली. मात्र कोरोना काळामुळे हे काम रेंगाळले. मात्र आता फडणवीस पुन्हा त्या कामाला गती देत असल्याचे दिसून आले आहे.

नव्या विधान भवनाची चार मजली इमारत राहणार असून जवळजवळ ६३ हजार चौरस फुटांवर हे बांधकाम होणार आहे. इथे विधानसभा आणि विधान परिषद या दोन्हींची सभागृहे राहतील. तसेच एक मध्यवर्ती सभागृह म्हणजे सेंट्रल हॉल देखील राहणार आहे. त्यामुळे दोन्ही सभागृहांची एकत्रित बैठक घेणे नागपुरात शक्य होणार आहे. साधारणपणे नवीन वर्षात पहिले अधिवेशन जे होत असते त्यावेळी दोन्ही सभागृहांतील सदस्यांना राज्यपाल संबोधित करत असतात. नागपुरात अशी वेळ फक्त १९८० साली आली होती. त्यावेळी सदस्य संख्या कमी होती. त्यामुळे तत्कालीन सभागृहात हे अभिभाषण होऊ शकले होते. नंतर सदस्य संख्या वाढली आणि आजच्या परिस्थितीत जर नवीन वर्षातील पहिले अधिवेशन नागपूरला घ्यायचे झाले, तर राज्यपालांचे अभिभाषण कुठे होणार हाच प्रश्न शासकीय यंत्रणांसमोर येतो. आता नवीन विधान भवन पूर्ण झाल्यावर तो प्रश्न येणार नाही असे दिसते आहे. या इमारतीत ही तीन सभागृहे त्याशिवाय समिती कक्ष तसेच सर्व मंत्र्यांसाठी आणि सर्व पक्षांसाठी स्वतंत्र संसदीय कार्यालय समिती कक्ष, ग्रंथालय प्रशासन कक्ष या सर्वांची सोय असल्याची माहिती आहे. म्हणजे एकदा त्या इमारतीत शिरले की आज जसे इमारतीतून बराकीत पायी शिरावे लागते तसे फिरावे लागणार नाही. त्यामुळेच सर्व संबंधित या निर्णयाचे स्वागत करीत आहेत. ज्याप्रमाणे नवीन विधान भवन होत आहे त्याचप्रमाणे अधिवेशन काळात मंत्र्यांची कार्यालये एकत्रित असावी अशीही एक इमारत व्हावी, अशी अनेकांची मागणी आहे. कारण सध्या मंत्र्यांच्या निवासाची व्यवस्था रवी भवन आणि नागभवन येथे असलेल्या छोटेखानी बंगल्यांमध्ये केलेली असते. मुख्यमंत्र्यांचे निवासस्थान तिथून दोन किलोमीटरवर, तर मुख्यमंत्र्यांचे कार्यालय देखील बरेच दूर आहे. रवी भवन आणि नागभवनमध्ये प्रत्येक बंगल्याच्या बाजूला असलेल्या गॅरेजमध्येच मंत्र्यांचे कार्यालय थाटले जाते आणि समोर मग मंडप टाकून येणाऱ्या जाणाऱ्यांना बसवले जाते. शिवाय एका मंत्र्याकडून दुसऱ्या मंत्र्याकडे जायचे असेल तर बरेच पायी फिरावे लागते. त्यामुळे मंत्र्यांच्या कार्यालयांसाठी देखील एक नवीन स्वतंत्र इमारत व्हावी, अशी जनसामान्यांची अपेक्षा आहे. जुन्या मध्य प्रांतात अशी एक इमारत उभारली गेली होती. ती सेक्रेटरीएट म्हणून ओळखली जायची. आता तिथे विभागीय आयुक्त कार्यालयासह इतर शासकीय कार्यालय आहेत.

# ओबीसींसह सर्व जातींच्या जनगणनेत अडथळे कोण आणताहेत?




२०१९ च्या निवडणूकीपुर्वी ओबीसींची जातीनिहाय जनगणना करण्याचा निर्णय एनडीए सरकारने घेतला. मंत्री राजनाथसिंह यांनी तो जाहीर केला. सरकार पक्षाने ऐतिहासिक निर्णय घेतल्याचा सर्वत्र डांगोरा पिटला. लोकसभा निवडणुकीत त्याचा प्रचार केला. मिडियाने देखील ओबीसीचे हितैशी सरकार म्हणून बातम्या पेरल्या. निवडणुकीत फायदा घेतला. हे का करावे लागले, याची पार्श्वभूमी समजून घेणे आवश्यक आहे.

✻ हा चौफेर ओबीसी जागरणाचा परिणाम मंडल आयोगाच्या काही शिफारशी तत्कालीन प्रधानमंत्री मा. व्ही. पी. सिंग यांनी लागू केल्यापासून त्यात खोडा घालण्याचे काम कमंडलवाद्यांनी केले. ओबीसी जनू शत्रू असल्यासारखे व्यवहार, एबीव्हीपी, बजरंग दल, विहीप इत्यादी संघाच्या संघटनांनी केले. ओबीसींच्या आरक्षणाला विरोध करण्यासाठी आगडोंब पसरवला. परंतु त्याचवेळी ओबीसी संघटनांनी देखील कंबर कसून संघर्ष केला. त्याला दलित आदिवासी संघटनांनी साथ दिली. ओबीसींची नाराजी संघ भाजपला परवडणारी नव्हती. त्यामुळे ओबीसी आरक्षणाला सरळ विरोध करण्याची भूमिका मागे घेऊन , शासन प्रशासनातील ओबीसींचा शिरकाव रोखण्यासाठी इतर उपाय योजले गेले. त्यातील पहिला उपाय म्हणजे ओबीसींना राम मंदिर आंदोलनात गुंतवणे आणि दुसरा उपाय मंडल शिफारशींची तोडफोड करणे, ओबीसींमध्ये फुट पाडणे, हे उपाय योजले गेले. सत्यशोधक विचारांच्या देशातील विविध ओबीसी बहुजन संघटनांनी ओबीसी जनगणनेसाठी दबाव निर्माण केला होता. काँग्रेसनी ओबीसी जनगणनेची मागणी लावून धरली होती. लालुप्रसाद यादवांच्या राष्ट्रीय जनता दलाने, अखिलेश यादवांच्या समाजवादी पक्षाने, स्टॅलिन यांच्या द्रविड मुनेत्र कझगमने,बहुजन समाज पार्टीने, रिपब्लिकन विचारांच्या विविध पक्षांनी ओबीसी जागृतीसाठी अभियान चालवले. त्यामुळे मजबुरीने, पराभवाच्या भितीने एनडीएने हा निर्णय घेतला. ओबीसींना वाटले, आता आपली जनगणना होईल. आपण कोणकोणत्या क्षेत्रात मागे पडलो, याची आकडेवारी समोर येईल. मंत्र्यांपेक्षा प्रशासनातील अधिकाऱ्यांकडे खरी सत्ता असते. तीथे ओबीसी अधिकारी किती आहेत? सर्व विभागात ओबीसी कर्मचारी किती आहेत? आयात निर्यात धोरण, शेतकरी हिताचे धोरण ठरवताना ओबीसी, शेतकरी हित पाहणारे ओबीसी कर्मचारी किती आहेत? न्यायव्यवस्थेत, मंदिर व्यवस्थापनात, मिडियामध्ये ॲंकर, चिफ एडिटर, विश्लेषक, मिडिया मॅनेजमेंट आणि मालक ओबीसी किती आहेत? कारखान्याचे मालक किती ओबीसी आहेत? केवळ मालक असूनही समाजाचे हित होत नाही. त्यात चालक किती ओबीसी आहेत? त्यातील मॅनेजर ओबीसी किती आहेत? त्याच्या पलीकडे जाऊन ओबीसींच्या हिताची काळजी घेणारे ओबीसी किती आहेत? लेबर काम करणारे ओबीसी किती आहेत? याचा डाटा पुढे येईल, असे ओबीसींना वाटायला लागले. आपण या क्षेत्रात किती मागे पडलो, हे स्पष्ट होईल. आपल्या मुलांना सर्व क्षेत्रात संधी मिळण्याचा मार्ग मोकळा होईल, अशी आशा ओबीसी करु लागला. सध्या वरील सर्व क्षेत्रात ब्राह्मण व तत्सम जातींचा भरणा मोठ्या प्रमाणात असल्याचे स्पष्ट दिसते. त्यातून या क्षेत्रातील सर्वात जास्त संपत्ती तथाकथित उच्च जातींच्या ताब्यात जाताना दिसते. ओबीसी कष्टकरी, शेतकरी या सर्वाधिक संपत्तीच्या क्षेत्रात किती अल्प प्रमाणात आहेत? आणि त्याच्या वाट्याची संपत्ती कोण फस्त करत आहेत? याची आकडेवारी ओबीसी जनगणनेतून पुढे येणार आहे. शिक्षणात, राहणीमानात, सामाजिक दर्जाबाबत ओबीसींचे काय स्थान आहे? तेही जनगणनेत स्पष्ट होईल. यामुळेच काही ओबीसींनी विश्वास ठेवून यांच्या पारड्यात मते टाकली. ज्यांना यांच्या मंडल आयोगापासूनच्या धोकेबाजीची कल्पना आहे, ते विरोधात उभे राहिले.

**✻जागृत ओबीसींना जी भिती होती तेच झाले.**

२०१९ ला सत्तेत आल्यानंतर तो ओबीसींना फसवण्याचा डाव होता, हे स्पष्ट झाले. ओबीसींची जातीनिहाय जनगणना करावी लागू नये म्हणून तब्बल सहा सात वर्षे जनगणनाच पुढे ढकलली. त्यानंतर ओबीसींच्या देशभरातील संघटना ओबीसींमध्ये जागृतीचे कार्य सातत्याने करीत राहिल्या. न्यायालयाच्या अनेक निर्णयांमधून ओबीसी किती मागासले आहेत? याची आकडेवारी उपलब्ध नसल्यामुळे ओबीसींच्या विकासासाठी कार्ययोजना आखता येत नसल्याचे शेरे पुढे आले. त्यातून ओबीसींच्या जातीनिहाय जनगणनेचे महत्त्व अधोरेखित झाले. त्यामुळे ओबीसी गोलबंध होऊन जातीनिहाय जनगणनेचा दबाव वाढवू लागला. ओबीसींचा हा दबाव झुगारण्यासाठी , ओबीसी जनगणना टाळण्यासाठी विविध डावपेच खेळले गेले.

**✻ओबीसींना नेतृत्वहीन करण्याचा प्रयत्न झाला**

२०२४ च्या लोकसभा निवडणुकीच्या वेळी देशभरात ओबीसी सोबत धोकेबाजी करणाऱ्या सरकारच्या विरोधात जनक्षोभ उसळला. ओबीसी, दलित, आदिवासी, धार्मिक अल्पसंख्यांक असे सर्व जनसमुह जातीनिहाय जनगणनेसाठी ओबीसींसोबत एकत्रितपणे लढायला लागले. इंडिया गठबंधन मध्ये सामाजिक न्याय वादी एकत्र दिसू लागले. पराभव स्पष्ट दिसू लागला. त्यामुळे नितीशकुमार सारखा ओबीसी मोहरा संघ भाजपच्या गोटात ओढून तसेच महाराष्ट्रातील शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस या पक्षांमधील बिभीषण गळाला लावून, पक्ष फोडून ओबीसी जनगणनेच्या समर्थक पक्षांना नामोहरम करण्याचा प्रयत्न झाला. ओबीसींना नेतृत्वहीन करण्याचा प्रयत्न झाला. तरीही देशभरातील ओबीसी बहुजनांनी भाजप एनडीएच्या तोंडाला फेस आणला. सुक्ष्मनियोजनाच्या नावाखाली निवडणुकीत सगळे प्रकार करून सुद्धा कुबड्यांचे सरकार केंद्रात आले. महाराष्ट्र आणि उत्तर प्रदेशात दाणादाण उडाली. तेव्हा फडणवीसला ओबीसी डीएनए आठवला. मराठा ओबीसी संघर्ष पेटवला गेला, स्वार्थी ओबीसी नेत्यांना गळाला लावले, निवडणूक प्रक्रियेत बऱ्याच गोष्टी करुन, विरोधकांना विभाजित करुन विधानसभा निवडणुकीत पाशवी बहुमत मिळवले. परंतु ओबीसी जागृती एवढ्यानेही थोपवली जाऊ शकणार नाही याची जाण असलेल्या सरसंघचालकापासून अनेकांचे स्टेटमेंट कधी ओबीसी जनगणनेच्या बाजूने तर कधी विरोधात येत राहिले. सरसंघचालक जातीव्यवस्था ब्राम्हणांनी तयार केल्याचे बोलतात, परंतु संघापासून, भाजपपासून, शासन प्रशासनापर्यंत ब्राम्हणांचा भरणा मोठ्या प्रमाणात करुन ओबीसींना डावलले आहे, हे मात्र सांगत नाही. आपण स्वतः देखील ओबीसी, दलित, आदिवासी यांना डावलण्यात सहभागी असल्याचे मात्र लपून ठेवतात. भक्त आणि कच्च्या ओबीसींच्या लक्षात ह्या बाबी येत नाही.

मंडल आयोगानंतर ओबीसींच्या जातजनगणनेसाठी मोठा होऊ पाहणारा ओबीसी उठाव सर्व क्षेत्रातील ब्राम्हणी वर्चस्व मोडून काढेल, याची जाणीव त्यांना झाली. ब्राम्हणी वर्चस्व अबाधित ठेवण्यासाठी वाटेल ते करायचे, परस्पर विरोधी स्टेटमेंट द्यायचे, ओबीसी हितासाठी लढणाऱ्या ओबीसी नेत्यांना नामोहरम करायचे, खोटेनाटे आरोप करुन बदनाम करायचे, खोटे नेते मिडियाच्या माध्यमातून मोठे करायचे, ओबीसी, दलित, आदिवासी समुहात विभाजन करायचे, असे प्रकार केले गेले.

**बिहार विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पुन्हा ओबीसी जनगणना करण्याचा निर्णय** ओबीसी जागृती मोठ्या प्रमाणात असलेल्या बिहारमध्ये लालुप्रसाद यादव सारख्या खंबीर ओबीसी नेत्याला पराभूत केल्याशिवाय ओबीसी उठावाला थोपवता येणार नाही, याचा कयास बांधून बिहार निवडणुकीच्या तोंडावर पुन्हा ओबीसी जनगणना करण्याचा निर्णय जाहीर करण्यात आला. याहीवेळी ओबीसी जनगणनेच्या निर्णयाला ऐतिहासिक, ऐतिहासिक म्हणून मिडीया आणि चंडीगँगने प्रचार केला. एकाच निर्णयाला किती वेळा ऐतिहासिक म्हणता येते ? याचं नवच व्याकरण पुढे आलं. जातीनिहाय जनगणना जाहीर करुन बिहार मधील ओबीसींना आम्ही ओबीसी जनगणना विरोधी नसल्याचा देखावा करण्यात आला. त्यासाठी नितीशकुमारचा चेहरा वापरण्यात आला. मंडल मसिहा, अस्सल ओबीसी बहुजन नेता लालुप्रसाद यादव यांना पराभूत करण्यासाठी, म्हणजेच ओबीसी उठाव थोपविण्यासाठी एडीचोटीचा जोर लावण्यात आला. ओबीसींना खोटी आस्वासने देण्यात आली. बिहारमधील ओबीसी बहुजनांना छोट्या छोट्या गटात विभाजित केले गेले, आचारसंहिता धाब्यावर बसवून लोकांना निवडणुकीच्या दिवसापर्यंत खैरात वाटण्यात आली. प्रशांत किशोरच्या माध्यमातून लोकांमध्ये संभ्रम निर्माण केला गेला. खरी समस्या पलायन असल्याची चर्चा मोठ्या प्रमाणात करण्यात आली. त्यासाठी वीस वर्षे सत्तेत असलेल्या जेडीयू भाजप सरकारला दोषी न ठरवता वीस वर्षांपूर्वीच्या लालुप्रसाद यादवांच्या सरकारला दोषी ठरवण्याचा आटापिटा करण्यात आला. हिंदू मुस्लिम करता येण्यासाठी ओवेसीला हवा देण्यात आली. एस आय आरचा वापर करण्यात आला. शेतात जंगलात काम करणाऱ्या, कष्टकऱ्यांच्या मुलांच्या शिक्षणाची व्यवस्था करणाऱ्या, ओबीसी, दलित, आदिवासी, मुस्लिम इत्यादी बहुजनांच्या उत्थानासाठी, सामाजिक न्यायासाठी आपली सत्ता वापरणाऱ्या लालुप्रसाद यादवांच्या कार्यकाळाला जंगलराज संबोधले. ओबीसी बहुजनांचे राज, समतेसाठी कार्य करणारे राज म्हणजे जातवर्चस्ववाद्यासाठी जंगलराज असेल परंतु वर्षानुवर्षे शोषित ओबीसी, दलित, आदिवासी आणि धार्मिक अल्पसंख्यांक समाजासाठी ते मंगलराज होते, लोकाभिमुख राज होते. जमिनीवर कष्ट करणाऱ्या, जंगल खोऱ्यात, गावाखेड्यात राहणाऱ्या लोकांच्या न्याय हक्कासाठी लढणाऱ्या लालुप्रसाद यादव यांचे राज्य कोणाला जंगलराज वाटत होते, हे समजून घेणे आवश्यक आहे. मागास म्हणजे जंगली लोकांच्या आर्थिक, सामाजिक उत्थानासाठी काम करणाऱ्या सरकारला जंगल राज संबोधले गेले. परंतु मागासवर्गीय समाजाने हे अभिमानाने सांगितले पाहिजे की आम्ही जंगली असलो तरी न्यायवादी आहोत. आमच्या हितासाठी काम करणाऱ्या सरकारला जंगलराज म्हणणाऱ्या वर्चस्ववाद्यांना ठणकावले पाहिजे की, आम्ही जंगली असलो तरी समतावादी आहोत. परंतु अल्पशिक्षित, अंधभक्त आणि वैयक्तिक संधीसाधू यांच्या आत्मघातकी भूमिकेमुळे वर्चस्ववाद्यांचे फावले. साध्या भोळ्या लोकांना भ्रमित करण्यात आले. सगळे प्रकार करून बिहार जिंकल्यानंतर आता ऐतिहासिक वगैरे ठरवलेला ओबीसी जनगणनेचा निर्णय पुन्हा गुंडाळल्या गेल्याचे चित्र जनगणनेच्या पहिल्या टप्प्याच्या फॉर्म वरुन, नोटीफिकेशनवरुन पुढे आले.

**✻ओबीसींना पुन्हा धोका दिला**

ओबीसीसोबत धोकेबाजी करण्याचा प्रकार पुन्हा घडताना दिसत आहे. अशावेळी ओबीसी डीएनए वाले, ओबीसी सेलवाले, ऐतिहासिक म्हणणारे, हेडलाईन्स छापणारे कोणत्या बिळात लपले? एकही शब्द बोलत नाही. भक्त बिचारे काहीच बोलत नाही. त्यांची पंचाईत झाली. आपण ओबीसी जनगणनेला ऐतिहासिक निर्णय म्हणून खूप उथल उथल केली. आणि आता ओबीसींसोबत धोकेबाजी होत आहे. भक्तांमध्ये ओबीसीही बऱ्यापैकी आहे. त्यांना मुस्लिम द्वेषाचे डोज वरच्यावर दिले जातात. परंतु खरी गोम अशी आहे की, ओबीसींना, शिक्षण, नोकऱ्या, सामाजिक स्तर या कोणत्याही बाबतीत मागे ठेवण्यात मुस्लिम, दलित, आदिवासी नाहीत. ओबीसी आरक्षणाला मंडल आयोगाच्या वेळीही यांनी विरोध केला नाही. आणि आता ओबीसींच्या जनगणनेसाठीही दलित आदिवासी मुस्लिम शीख ख्रिश्चन यापैकी कोणाचाही विरोध नाही. ओबीसींच्या हितासाठी असलेल्या जनगणनेला विरोध स्वतःला हिंदू धर्माचे मालक समजणारे संघ भाजपचे मुखंड असलेले विषमतावादी ब्राम्हणी कडबोळे करत आहे. ओबीसी हिंदूंच्या हिताआड येणारे ओबीसी पोरांना मुस्लिम द्वेष शिकवायची एकही संधी सोडत नाही. परंतु ओबीसी आपल्या बरोबरीचे होऊ नये यासाठी कारस्थाने करतात. ओबीसी भावंडांनो हे समजून घ्या.

**अडथळे**

ओबीसी प्रतिनिधींनींना, ओबीसी विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती मध्ये, ओबीसींच्या नोकर भरतीच्या वेळी, ओबीसींच्या बढतीच्या वेळी, ओबीसी शेतकऱ्यांच्या समश्या सोडवताना, ओबीसी जनगणना करताना नेमक्या येतातच कशा? धर्माचे ठेकेदार ओबीसींना भावंडं का समजत नाही? त्यांना बरोबरीचा न्याय असला पाहिजे हे का वाटत नाही? त्याच्या वाट्याची सत्ता, संपत्ती त्याला मिळाली पाहिजे, त्याला प्रशासनात ५२ टक्के हक्काचा वाटा मिळाला पाहिजे असे का वाटत नाही? यावरुन ओबीसींना ते बरोबरीचे बांधव समजत नाही. त्यांच्या कष्टवर मुनाफेखोरीचे जीवन जगू इच्छितात. धर्म ग्रंथांच्या माध्यमातून त्यांनी तो व्यवहार ओबीसींसोबत वारंवार केला. ओबीसींना डावलणे आपला अधिकार असल्याचं त्यांना वाटते. म्हणून ते आजही ओबीसी जनगणनेला विरोध करण्याची हिंमत करत आहे.

ओबीसींना सहज मुर्ख बणवता येते हा समज त्यांच्यामध्ये दृढ झाला आहे. त्यांचा हा स्वार्थी समज ओबीसींना एकजुटीने संघर्ष करुन खोडून काढावा लागेल. आपल्या सोबत डावपेच खेळणारांना धडा शिकवण्यासाठी सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, सांस्कृतिक इत्यादि सर्व क्षेत्रातील कर्मचारी, अधिकारी, लोकप्रतिनिधी, शेतकरी, कामगार विद्यार्थी आदी सर्वांची एकजूट घडवून संघर्ष करणे निकडीचे झाले आहे. देशाच्या अस्सल मालकाची ५२ टक्के कष्करी जनसमुहाची हेटाळणी होत असेल तर विशेषतः लोकप्रतिनिधी आणि कमचारी यांनी आपल्या आत्मसन्मानाची ही लढाई निकराने लढलीच पाहिजे. ओबीसी एकजुटीतच आपलं वैयक्तिक हीत देखील आहे. किरकोळ हितापेक्षा आत्मसन्मानाला, सामाजिक न्याय्यहक्काला सर्वाधिक महत्त्व देऊन आतातरी लहानमोठेपणाचा भाव विसरून सर्वांची एकजूट घडविण्यासाठी गतीने कामाला लागूया.

उठ ओबीसी जागा हों संघर्षाचा धागा हों

**–बाबा बीडकर**

# विवाहसोहळ्यातून समाजप्रबोधन; अगडे परिवाराचा अभिनव उपक्रम




समाजात लग्नसमारंभ म्हटले की भव्य सजावट, रोषणाई आणि उत्सवाचे वातावरण असे चित्र डोळ्यासमोर उभे राहते. मात्र येथील सेवानिवृत्त केंद्रप्रमुख रघुपती अगडे यांच्या कुटुंबाने आपल्या कुटुंबातील विवाह समारंभाला एक वेगळी सामाजिक दिशा देत समाजासमोर प्रेरणादायी आदर्श निर्माण केला आहे. लग्नस्थळी भारतातील महान महापुरुषांचे विचार आणि छायाचित्र असलेले आकर्षक बॅनर लावून त्यांनी समाजजागृतीचा अभिनव उपक्रम राबविला.

समारंभस्थळी तथागत गौतम बुद्ध, संत कबीर, संत तुकाराम महाराज, संत संताजी जगनाडे महाराज, राजमाता जिजाऊ, छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा जोतिराव फुले, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले, राजर्षी शाहू महाराज, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, संत तुकडोजी महाराज, संत गाडगेबाबा, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे आणि कांशीराम यांसारख्या महान व्यक्तींचे प्रेरणादायी विचार प्रदर्शित करण्यात आले होते.

त्यामुळे लग्नसमारंभात उपस्थित पाहुण्यांना या महापुरुषांच्या कार्याची आठवण होत समाजाला दिशा देणारा संदेश मिळाला.

या अभिनव उपक्रमामुळे उपस्थित पाहुणे, युवक आणि लहान मुलांमध्येही महापुरुषांविषयी उत्सुकता व आदर निर्माण झाला. अनेकांनी या प्रयत्नाचे कौतुक करत अशा प्रकारचे उपक्रम समाजातील इतर समारंभामध्येही राबवले जावेत, अशी अपेक्षा व्यक्त केली.

अगडे परिवाराचा हा उपक्रम केवळ एका कुटुंबाचा कार्यक्रम न राहता समाजासाठी प्रेरणादायी संदेश ठरला असून, आनंदाच्या प्रसंगालाही समाजजागृतीची जोड देत त्यांनी एक नवीन विचार समाजासमोर मांडला आहे.

# दहावीच्या परीक्षेत सापडले तीन बोगस परीक्षार्थी

**सालेकसा** : जिल्ह्यासह तालुक्यात दहावीची परीक्षा सुरळीत सुरू आहे. अशात (ता. १३) जिल्हा परिषद हायस्कूल कावराबांध येथील केंद्रावर विज्ञान विषयाचा पेपर सुरू असताना भरारी पथकाने परीक्षा केंद्रावर धडक दिली. दरम्यान पथकाला तीन बोगस विद्यार्थी आढळून आले. या प्रकाराने तालुक्यात एकच खळबळ उडाली. तीनही बोगस विद्यार्थी हे मध्यप्रदेश राज्यातील लांजी तालुक्यातील कारंजा येथील राहणारे आहेत. केंद्र संचालक ए. एस. कोरे यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा नोंद केला आहे. वैभव सदानंद मटाले, समीर धर्मराज मटाले आणि मयंक ठमकलाल बनोठे तिघे रा. मुक्काम कारंजा ता. लांजी (मप्र) असे बोगस परीक्षार्थीची नावे आहेत.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे दहावीची परीक्षा घेतली जात आहे. परीक्षा अंतिम टप्प्यात आली आहे. जिल्हा शिक्षण विभागाच्या वतीने कॉपीमुक्त वातावरणातपरीक्षा पार पडावी, याकरीता अनेक उपाययोजना केल्या आहेत. यानुरूप जिल्ह्यासह तालुक्यात दहावीची परीक्षा सुरळीत सुरू असल्याचे दिसून आले. त्यातच (ता. १३) विज्ञान-२ विषयाचा पेपर होता. परीक्षा केंद्र क्रमांक २१७७ जि. प. हास्कूल व ज्युनीयर कॉलेज कावराबांध येथे खोली क्र. ०२ मधील रोल नंबर जे-१४८९८९ चा विद्यार्थी नामे सुमीत जयचंद चौधरी च्या ठिकाणी वैभव सदानंद मटाले (१५) रा. कारंजा, ता. लांजी (मप्र), खोली क्र. १७ मधील रोल नंबर जे-१४९०१३ चा विद्यार्थी नामे वैध्यच्या ठिकाणी मयंक ठमकलाल बनोठे (१५) रा. बापडी, ता. लांजी (मप्र) आणि खोली क्र. २३ मधील रोल नंबर जे-१४८९७१ चा विद्यार्थी नामे भोंडेकरच्या ठिकाणी समीर धर्मराज मटाले (१५) रा. कारंजा, ता. लांजी (मप्र) असे तीन बोगस विद्यार्थी परिक्षेचे हॉल टिकट स्वतःकडे बाळगून नमूद रोल नंबरच्या ठिकाणी बसून ते स्वतः परिक्षेचे विद्यार्थी असल्याचे परिक्षा कक्ष पर्यवेक्षक यांना भाषवून विज्ञान-२ विषयाचा पेपर सोडविताना आढळले. हा प्रकार निदर्शनास येताच एकच खळबळ उडाली.

यामुळे केंद्रावरील अनागोंदी कारभार चव्हाट्यावर आला. या प्रकरणी केंद्र संचालक ए. एस. कोरे यांच्या तक्रारीवरून सालेकसा पोलिसांनी गुन्हा नोंद केला आहे. पोलिसांनी बोगस विद्यार्थ्यांना ताब्यात घेऊन तपास सुरू केला आहे. पुढील तपास पोनि भुषण बुराडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोउपनि चव्हाण करीत आहेत.

**केंद्र संचालक व मुख्याध्यापकाच्या कृतीवर आश्चर्य?**

दहावी बोर्डाची परीक्षा सुरू असताना ज्या विद्यार्थ्यांच्या नावाने परीक्षा देण्यासाठी प्रवेश पत्र आले होते. ते विद्यार्थी परीक्षा न देता त्यांच्या नावावर इतर बोगस विद्यार्थी परीक्षा देत असल्याचे उघड झाले. हे बोगस विद्यार्थी विज्ञान विषयाच्या पहिल्या पेपरला अनुपस्थित होते मात्र दुसऱ्या पेपरला परीक्षा देण्यासाठी केंद्रावर उपस्थित झाले. अशात या परीक्षा केंद्रावर आणखी किती बोगस विद्यार्थी परीक्षा देत असावेत याबद्दल शंका निर्माण झाली. तर दुसरीकडे लापरवाही बाळगत असलेले केंद्र संचालक आनंद कोरे आणि मुख्याध्यापक एच. पी. दराडे यांची कार्यप्रणालीही चर्चेत आली आहे. बोगस विद्यार्थी परीक्षा देत असल्याची माहिती केंद्र संचालक व मुख्याध्यापकाला नसणे, यावरही खमंग चर्चा रंगली आहे.

विशेष म्हणजे, जिल्हा परिषद हायस्कूल काबराबांध येथे दरवर्षी दुसऱ्याराज्यातील दूरदूरचे विद्यार्थी बोगसरीत्या भरती करून तुकड्या चालवण्याचे प्रकार सुरू आहेत. यापैकी बरेच विद्यार्थी वर्ष भर शाळेत हजेरी लावत नाही. परंतु शाळेच्या नोंदवहीवर हजेरी दाखवली जाते. यातील अनेक विद्यार्थी परीक्षा देण्यासाठी सुद्धा पोहोचत नाही.

अशावेळी येथील काही शिक्षक मिलीभगत करून बोगस विद्यार्थी परीक्षेला बसवून आपले चांगभलं करीत असल्याची चर्चा पालकांमध्ये आहे.

# संत तुकाराम महाराज बीजोत्सव थाटात

**गोरेगाव–** तालुक्यातील गोवारीटोला येथे संत तुकाराम महाराज बीजोत्सव थाटात साजरा करण्यात आला. आजपर्यंत या गावाच्या इतिहासात जि.प. अध्यक्ष पदावरील कोणत्याही मान्यवरांची उपस्थिती लाभली नव्हती. मात्र यंदा संत तुकाराम महाराज बीज दिवसाच्या पवित्र निमित्ताने गोंदिया जिल्हा परिषदेचे अध्यक्ष लायकराम भेंडारकर यांनी प्रथमच गोवारीटोला गावाला भेट दिली. त्यांच्या आगमनामुळे गावात उत्साह आणि अभिमानाचे वातावरण निर्माण झाले. गावकऱ्यांसाठी हा क्षण अत्यंत भावनिक आणि प्रेरणादायी ठरला. यावेळी आयोजित कार्यक्रमात अध्यात्म, संस्कृती आणि सामाजिक एकतेचा सुंदर संगम अनुभवायला मिळाला.संत तुकाराम महाराजांच्या विचारांचा संदेश समाजापर्यंत पोहोचविताना भेंडारकर यांनी एकता, सद्भावना, समाजसेवा आणि विकासाच्या मार्गावर ठामपणे चालण्याचे महत्त्व अधोरेखित केले. त्यांच्या प्रभावी आणि संवेदनशील भाषणामुळे उपस्थित ग्रामस्थांमध्ये नवी ऊर्जा आणि प्रेरणा निर्माण झाली. या पवित्र प्रसंगी पारंपरिक पद्धतीने दहीकाला पूजन करून संत परंपरेचा सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमादरम्यान भक्तिमय वातावरणात भजन, कीर्तन आणि आध्यात्मिक संदेशांनी उपस्थिताना मंत्रमुग्ध केले. कार्यक्रमाला जि.प. गोंदियाचे बांधकाम सभापती डॉ. लक्ष्मण भगत तसेच पंचायत समितीचे माजी सभापती मनोज बोपचे यांचीही प्रमुख उपस्थिती लाभली. कार्यक्रमात हिरकण्या मेहंदळे, प्रभुदास पारधी,

तोरणकर, राधेश्याम पटले आणि नरेंद्र पटले यांचेही मार्गदर्शन लाभले. कीर्तन व प्रवचनातून संत तुकाराम महाराजांच्या शिकवणीचा आणि भक्तीपरंपरेचा संदेश समाजापर्यंत पोहोचविण्यात आला.

# राज्यातील शाळांमध्ये पर्यावरण जनजागृती शिक्षण मिळणार



**गोंदिया** : लहानपणापासून जागरूकता निर्माण करण्यासाठी राज्यातील शाळांमध्ये पर्यावरण जनजागृती शिक्षण मिळणार आहे ,असे राज्याचे शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी म्हटले आहे. पर्यावरणाबाबत राज्यातील विद्यार्थ्यांमध्ये लहानपणापासून जागरूकता निर्माण करण्यासाठी शालेय शिक्षण विभागाने केंब्रिज युनिव्हर्सिटी प्रेस अँड असेसमेंट इंडिया यांच्या सहकार्याने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. जगासमोर उभ्या असलेल्या हवामान बदलाच्या संकटाचा विचार करता विद्यार्थ्यांमध्ये बालपणापासूनच पर्यावरणाबाबत जागरूकता निर्माण करणे अत्यंत गरजेचे आहे. त्यासाठी शिक्षण विभाग विविध उपक्रम राबवत असून केंब्रिज क्लायमेट क्रेस्टद्वारे हवामान शिक्षण त्याचाच एक भाग असून पर्यावरण जनजागृतीसाठी शालेय शिक्षण विभागाने पुढाकार घेतला असल्याचे शालेय शिक्षण मंत्री म्हणाले आहेत.

